# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**'निर्माता'** हे पद प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे (Walk In Interview)भरण्याची जाहिरात
(विस्तृत जाहिरात संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यावाणी कम्युनिटी रेडिओ विभागाकरिता 'निर्माता' हे पद विद्यावाणी कम्युनिटी रेडिओ केंद्राच्या निधीतून हंगामी स्वरुपात करार पध्दतीने सरळ सेवेने पाच वर्षे कालावधीसाठी भरण्यासाठी पात्र उमेदवारांनी दिनांक ०१/११/२०१४ ते दिनांक १७/११/२०१४ या कालावधीत विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज भरावयाचा आहे. विहित नमुन्यातील भरावयाचा ऑनलाईन अर्ज विद्यापीठाच्या http://registrar.unipune.ac.in/recruitment या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | पदनाम व एकत्रित वेतन | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १. | निर्माता<br>दरमहा एकत्रित वेतन<br>रु.१५०००/- | ०३ | खुला - २<br>अनु.जाती - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी.<br>२. रेडिओच्या विविध कार्यक्रमांसाठी लेखन, कार्यक्रम निर्मितीत प्रत्यक्ष सहभाग, बाहयध्वनीमुद्रण, मुलाखती, परिसंवाद थेट प्रसारण इत्यादी कार्यक्रमांचा कमीत कमी पाच वर्षांचा अनुभव.<br>**अपेक्षित पात्रता :**<br>संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या या विषयातील पदवीधरांना प्राधान्य. संवाद कौशल्य, प्रसारणयोग्य आवाज, कार्यक्रमांच्या निर्मितीसाठी विविध संगणक प्रणालींचे ज्ञान, संगणकावर ध्वनीमुद्रण आणि संकलन यांचा अनुभव, कार्यक्रमांच्या गरजेनुसार अतिरिक्त वेळ काम करण्याची तयारी. |

## - सर्वसाधारण सूचना -

- **ऑनलाईन अर्ज करण्याविषयीची माहिती :**

१) ऑनलाईन पध्दतीने अर्ज दिनांक ०१/११/२०१४ ते दिनांक १७/११/२०१४ या कालावधीत भरावयाचा आहे.

२) ऑनलाईन पध्दतीने अर्ज केल्यानंतर त्याची प्रिंटआऊट घेऊन स्वाक्षरीसह एक प्रत आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या सांक्षाकित प्रती नजीकच्या काळातील पासपोर्ट आकाराचे स्वतःचे छायाचित्र चिकटवून आणि रोख अथवा ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या चलनाची विद्यापीठ प्रतीसह खालील दिलेल्या दिवशी व वेळेत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी आपल्या मूळ कागदपत्रांसह उपस्थित रहावे.

| मुलाखतीचा वार व दिनांक | मुलाखतीची वेळ | मुलाखतीचे ठिकाण |
|---|---|---|
| शनिवार,<br>२२/११/२०१४ | सकाळी ११.३० वाजता | मा.कुलसचिव कार्यालय<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,<br>गणेशखिंड, पुणे ४११ ००७. |

- **ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत :**

१) उमेदवाराने विद्यापीठ संकेतस्थळावरील विस्तृत जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

२) उमेदवाराने प्रत्यक्ष मुलाखतीच्या दिवशी अर्ज (Hard Copy) विद्यापीठात सादर करतांना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे व अर्ज शुल्काच्या चलनाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

३) ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

४) ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना सर्वप्रथम संकेतस्थळावर जाऊन स्वतःची नोंदणी (Create Account) करावयाचे आहे.

५) संकेतस्थळावर स्वतःची नोंदणी करतांना उमेदवाराने त्याची वैयक्तिक माहिती अचूकरित्या भरुन युजर नेम व पासवर्ड तयार करावा.

६) Login मध्ये युजर नेम व पासवर्ड टाकल्यावर अर्जदाराने वैयक्तिक, प्रवर्ग (आरक्षण), शैक्षणिक आणि अनुभवासंदर्भातील माहिती अचूकरित्या दिलेल्या क्रमाने भरावी.

७) "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या शीर्षकावर जाण्यापूर्वी अर्जदाराने वैयक्तिक, प्रवर्ग (आरक्षण), शैक्षणिक आणि अनुभवासंदर्भातील माहिती बरोबर असल्याची खात्री करावी. त्यानंतर उमेदवारास वरील माहितीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

८) अर्जाचे शुल्क खुल्या गटातील उमेदवारांसाठी रु.४००/- व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु.२००/- इतके आहे. "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या लिंकवर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने त्यास ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदासंदर्भातील माहिती भरल्यानंतर अर्जाच्या शुल्काचे तीन प्रतीत तयार झालेले चलन बँक ऑफ महाराष्ट्र (Bank of Maharashtra) अथवा एच.डी.एफ.सी. (HDFC Bank) च्या कोणत्याही शाखेत रोख भरण्यात यावे. तसेच अर्जाचे शुल्क डेबीट / क्रेडिट कार्डद्वारे ऑनलाईन पध्दतीने सुध्दा भरता येतील. तद्नंतरच अर्ज भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण होईल. त्यानंतर अर्जाची प्रिंटआऊट काढावी.

९) ऑनलाईन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकानंतर जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेल्या पदाकरिता अर्ज (Apply) करता येणार नाही.

१०) वरील पदासाठी फक्त विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

- **वयोमर्यादाः**

१) अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकास वयोमर्यादा गणली जाईल.

२) उमेदवाराचे वय अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकास किमान १८ वर्षे पूर्ण व कमाल खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३३ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी ३८ वर्षे अशी राहिल.

३) सर्व मान्यताप्राप्त विद्यापीठे आणि अशा विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था तसेच शासकीय/निमशासकीय कार्यालयांमध्ये कार्यरत सेवकांसाठी उच्चतम वयोमर्यादेची अट लागू नाही.

- **मागासवर्गीयांचे आरक्षण :**

१. जातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ महाराष्ट्र अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासवर्ग, शै.सा.मा.प्र. व विमाप्र-अ (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम - २००० मधील तरतुदींनुसार सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

२. वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र, इमाव, शै.सा.मा.प्र. व विमाप्र-अ या प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्यास तसे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतच्या नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत कागदपत्रांच्या छाननीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा अशा उमेदवारांचा मागासवर्गाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही. (आर्थिक वर्ष २०१३-१४ चे दिनांक १ एप्रिल, २०१४ नंतर सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल.)

३. उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणा-या वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र, इमाव, शै.सा.मा.प्र. व विमाप्र-अ या प्रवर्गातील उमेदवारांना वयोमर्यादा, आरक्षण या सवलतींसह कोणत्याही सवलतीस पात्र समजले जाणार नाही.

४. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर, २०११ नुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत सादर करण्याच्या अटीवर व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन राहून नियुक्ती दिली जाईल. नियुक्ती दिल्यावर जात पडताळणीसाठीचा प्रस्ताव हा पडताळणी समितीकडे सादर केल्याची पोहोच कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

५. सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम मधील तरतुदीनुसार विमुक्ती जाती (अ), भटक्या जमाती (ब),(क),(ड) प्रवर्गासाठी विहित केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनिय असेल.

- **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापनः**

१) शासनाने शासकीय विभागातील गट - अ,ब,क आणि ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५, दिनांक २८ मार्च, २००५ च्या अधिसूचनेद्वारे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन विहित केले आहे. या नियमांतील तरतुदींनुसार शासकीय सेवेतील पदासाठी अर्ज करतांना अर्जासोबत उमेदवाराने विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे.

२) प्रतिज्ञापनात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार विद्यापीठ सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यात येईल.

- **इतर सूचना :**

१) अर्ज भरावयाच्या अंतिम दिनांकास असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व वय ग्राहय धरण्यात येईल.

२) सदर पदाकरिता पोस्टाने अथवा इतर माध्यमातून प्राप्त होणारे व विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य पध्दतीने केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

३) मुलाखतीस उपस्थित राहताना उमेदवारांनी अर्जासोबत खालीलप्रमाणे प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

**(१)** कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र.
**(२)** अनुभवाचे प्रमाणपत्र.
**(३)** जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र. (आवश्यक असल्यास)
**(४)** नियोक्त्याचे मूळ ना हरकत प्रमाणपत्र.
**(५)** वयाबाबत जन्मतारखेचा दाखला/एस.एस.सी.चे प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला.
**(६)** नावातील बदलाबाबत शासन राजपत्र/विवाहनोंदणी प्रमाणपत्र.
**(७)** रोख अथवा ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या चलनाची प्रत.

४) अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालिक, अशंकालिक, विद्यावेतन, अंशदानात्मक विनावेतन तत्वावर केलेला अंशकालिक सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

५) पात्र उमेदवाराची निवड झाल्यास विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयांमधील आस्थापनांमध्ये नियुक्ती अथवा बदली करण्यात येईल.

६) अर्जदारांनी नावातील बदलाबाबत शासन राजपत्राची साक्षांकित प्रत, विशेषतः महिला उमेदवारांनी नावातील बदलाबाबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा शासन राजपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

७) या भरती प्रकियेसंदर्भात या कार्यालयाकडून वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना विद्यापीठाच्या http://registrar.unipune.ac.in/recruitment या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांनी वरील संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी पाहावी.

८) अर्जदाराने अर्ज करतेवेळी शिक्षण, वय, पदासाठी असलेले आरक्षण याबाबी विचारात घेऊन ऑनलाईन अर्ज भरावा.

९) सध्या सेवेत असणा-या उमेदवारांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयप्रमुखांच्या परवानगीने भरावे व नियोक्त्याचे मूळ ना-हरकत प्रमाणपत्र व वेतनचिठ्ठी / वेतन प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

१०) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशासन २००/प्र.क्र./२००१/३२, दिनांक २० जुलै, २००२ नुसार अनुषंगिक सुधारित शासन निर्णयान्वये उपरोक्त पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे खाली नमूद केलेल्या पैकी एक प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

   १) डी.ओ.इ.ए.सी.सी संस्थेच्या अधिकृत 'सी.सी.सी.' किंवा 'ओ' स्तर, किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

   २) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र.

   ३) माहिती व तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) कडील शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ अन्वये नमूद केलेल्या संगणक / माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

११) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी विद्यापीठ निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता अशा उमेदवाराची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१२) अर्ज स्विकारणे किंवा नाकारणे याबाबत विद्यापीठामार्फत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१३) जाहिरातीमधील नमूद पदे भरणे किंवा न भरणे याचा हक्क विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

जाहिरात क्रमांक : ५२
दिनांक : ०१/११/२०१४

**(डॉ. नरेंद्र मा. कडू)**
कुलसचिव